DR. BABASAHEB AMBEDKAR
MARATHWADA UNIVERSITY,
Chhatrapait Sambhajinagar Maharashtra
NAAC – Accredited "A"
Tele. :
Office PBX: (0240) 2403399/400
M.Sc. :- (0240) 2403180
FAX :- (0240) 2043199/188

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजी नगर -४३१ ००४
महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ+ " दर्जा प्राप्त

संदर्भ क्र. परीक्षा/प्रात्याक्षिक परीक्षा/एम. एस्सी./२०२४-२५/1776 दि. १०/१२/२०२४

## "प्रात्याक्षिक व अंतर्गत परीक्षेचे वेळापत्रक"

प्रति,
विभाग प्रमुख/प्राचार्य,
सर्व पद्व्युत्तर विभाग (विज्ञान शाखा) व
सर्व सलंग्नीत महाविद्यालये, (विज्ञान शाखा)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय** : ऑक्टो/नोव्हें - २०२४ एम. एस्सी. विज्ञान विद्याशाखेतील (**WEF-2021-2022, P-2015 & NEP-2022**) या पॅटर्नच्या प्रथम, द्वितीय, तृतिय आणि चतुर्थ (सत्र पध्दत) सत्राच्या प्रात्याक्षिक व अंतर्गत गुणाची परीक्षा घेणे बाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **M.Sc.** च्या ऑक्टो/नोव्हें - २०२४ मध्ये होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एम.एस्सी. प्रथम ते चतुर्थ सत्राच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्याक्षिक परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी खालील मार्गदर्शक मुद्याचे पालन करून प्रात्याक्षिक परीक्षा सर्व विद्यापीठीय विभाग, उस्मानाबाद केंद्र व सलंग्नीत महाविद्यालये यांनी घेण्यात याव्यात.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रात्याक्षिक व अंतर्गत गुण परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| **01** | **M.Sc.** | **17- 12 - 2024 To 28 - 12 - 2024** |

(महत्वाची सुचना : ०१ **M.Sc.** सत्राच्या प्रात्याक्षिक परीक्षेच्या गुणयाद्या बाबत प्रस्तुत पत्रातील अनु. क्र. ०१ व ०३ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
०२. उपरोक्त दर्शविलेल्या प्रात्याक्षिक परीक्षेचे बैठक क्रमांक प्रात्याक्षिक व अंतर्गत परीक्षेचा आरंभ होण्यापुर्वी संबधित महाविद्यालयाकडून बैठक क्रमांक प्राप्त करून घ्यावेत.)
०३. वरील संदर्भिय परिपत्रकांचे गांभीर्याने अवलोकन करून त्या परिपत्रकात समाविष्ट केलेल्या बाबींचा विचार करूनच प्रात्यक्षिक व अंतर्गत परीक्षा घेण्यात याव्यात.

१. बहिस्थ परीक्षक म्हणून इतर महाविद्यालयातील किंवा विद्यापीठानी दिलेल्या पॅनलमधून संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याने विषयाच्या प्राध्यापकाची नेमणूक करुन, प्रात्याक्षीक परीक्षक म्हणुन नियुक्ती पत्र देऊन त्यांच्या उपस्थितीत परीक्षा घेण्यात याव्यात.

२. प्रात्याक्षिक परीक्षेचे वेळापत्रक (बॅचेस्) हे विषय Combination नुसार विद्यापीठाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे तयार करावे आणि विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावाव्यात.

३. सर्व विषयांच्या प्रात्याक्षिक परीक्षेच्या गुण याद्या बंद लिफाफ्यावर परीक्षेचे नाव, बॅचेस, वर्ग, विषयाचे नाव, पेपरचे नाव, केंद्राचे नाव, तसेच परीक्षकांच्या स्वाक्षरीसहीत पुर्ण नाव व विभागाचे नाव नमुद करून सत्रानुसार बंद लिफाफ्यात एकत्रित सिल करून प्रस्तुत विभाग प्रमुखाकडे जमा करून घेण्यात याव्यात, तद्नंतर विभाग प्रमुखांनी त्यांच्या समक्ष बंद लिफाफ्यातील गुणयाद्या खुल्या करून **Data Entry** करीता विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांकडे त्वरीत उपलब्ध करून देण्यात याव्यात.

४. सर्व विभागानी प्रत्येक विषयाच्या गुण याद्या सोबत उपस्थिती अहवाल व अनुपस्थिती अहवाल परीक्षा संपल्यानंतर त्वरीत सादर करावा.

५. **एम.एस्सी. प्रथम (सत्र पध्दत) प्रात्यक्षिक व अंतर्गत गुण परीक्षेच्या गुणयाद्या ADES (Assessment Data Export File) वर Data Entry करून (www.bamu.digitaluniversity.ac) या संकेत स्थळावर Result Data निकाल घोषित करण्याकरीता उपलब्ध झाल्याबाबतची खात्री करूनच, तद्नंतर हार्ड कॉपी (Hard Copy) (प्रिंट) संबंधीत परीक्षक/नियामक व विभाग प्रमुख यांचे स्वाक्षरीसह प्रात्याक्षिक परीक्षा संपल्यानंतर ०८ दिवसात परीक्षा विभागातील एम. एस्सी कक्षामध्ये सादर करून त्याची पोच घ्यावी.**

६. विद्यापीठाकडून परिक्षार्थीचे बैठक क्रमांक प्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रात्याक्षिक परीक्षा संबंधित विभाग व महाविद्यालयांनी घेण्यात यावी. पी. आर. एन. नंबरने घेतलेल्या परीक्षा स्वीकारल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

७. **निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार जे विद्यापीठातील विभाग वेळेच्या आत अनु क्र. ४ अन्वये कार्यवाही करणार नाहीत, अशा विभागांना दि. १४/१२/२०२१ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या निर्णयानुसार निकालाच्या दिनांकापासून पहिले १० दिवस रू. २०००/- व नंतरच्या ५ दिवसांसाठी रू. ३०००/- प्रती विद्यार्थी (तीन हजार फक्त) दंड आकारण्यात येईल.**

टिप : सदरील पत्र विद्यापीठाच्या **www.bamu.digitaluniversity.ac**. संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

Bharti

संचालक
परीक्षा व मूल्यमांपन मंडळ

या प्रत्राची प्रत- समन्वयक, ई-सुविधा केंद्र यांना देण्यात येऊन कळविण्यात येईल.

Bharti

संचालक
परीक्षा व मूल्यमांपन मंडळ